# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

निष्काम जन सेवार्थ समर्पिता

**सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक १८.०६.२०१६ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक २२)**
**रोजी संपन्न झालेल्या सभेचे इतिवृत्त**

शनिवार दिनांक १८.०६.२०१६ रोजी (कार्यक्रम पत्रिका क्रमांक-२२) मा.महापौर श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी ११.०५ वाजता वंदेमातरम् या गीताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त ओम प्रकाश बकोरीया,आयएएस, तसेच नगर सचिव, श्रीमती अपर्णा थेटे व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. | स.स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल |
| २. | स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव |
| ३. | स.स. श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी |
| ४. | स.स. श्री.बमणे पुनमचंद सोनाजी |
| ५. | स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू |
| ६. | स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण |
| ७. | स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग |
| ८. | स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे |
| ९. | स.स. सौ.रोजतकर पुष्पा उत्तमराव |
| १०. | स.स. श्री.विजय साईनाथ औताडे |
| ११. | स.स. श्री.सुरे सीताराम इसराम |
| १२. | स.स. सौ.स्वाती किशोर नागरे |
| १३. | स.स. श्री.खान अय्युब म.हुसेन खान |
| १४. | स.स. श्रीमती निकाळजे आशा विजय |
| १५. | स.स. श्री.शेजवळ सुभाष सयाजी |
| १६. | स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद |
| १७. | स.स. श्रीमती दाभाडे प्रेमलता मिलींद |
| १८. | स.स. श्री.सय्यद मतीन रशीद |
| १९. | स.स. श्रीमती शकीला बेगम फय्याजोद्दीन |
| २०. | स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल |
| २१. | स.स. श्रीमती सय्यद सरवतबेगम आरेफ हुसैनी |
| २२. | स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन |
| २३. | स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम |
| २४. | स.स. श्रीमती खरात सिमा गणपत |
| २५. | स.स. सौ.शोभा नारायणराव वळसे |
| २६. | स.स. सौ.ज्योती सुभाष पिंजरकर |
| २७. | स.स. श्रीमती सोनवणे भारती महेंद्र |
| २८. | स.स. श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी |

| | |
|---|---|
| २९. | स.स. श्रीमती संगिता सुभाष वाघुले |
| ३०. | स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग |
| ३१. | स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप |
| ३२. | स.स. श्री.शिंदे राजु रामराव |
| ३३. | स.स. श्रीमती खरात सुरेखा गौतम |
| ३४. | स.स. श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी |
| ३५. | स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम |
| ३६. | स.स. श्रीमती नसीम बी सांडु खॉ |
| ३७. | स.स. श्री.अजीम अहेमद रफीक |
| ३८. | स.स. श्रीमती साजेदा फारुखी सईद फारुखी |
| ३९. | स.स. श्रीमती खतीजा कुरैशी छोटू कुरैशी |
| ४०. | स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन |
| ४१. | स.स. कु.यशश्री लक्ष्मीनारायण बाखरीया |
| ४२. | स.स. श्री.तनवाणी राजु लेखराज |
| ४३. | स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव |
| ४४. | स.स. श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखॉ |
| ४५. | स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे |
| ४६. | स.स. श्री.एडके विकास प्रकाश |
| ४७. | स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय |
| ४८. | स.स. श्री.भादवे रामेश्वर बाबुराव |
| ४९. | स.स. श्री.बल्लाळ मनोज आसाराम |
| ५०. | स.स. श्रीमती मलेका बेगम हबीब कुरैशी |
| ५१. | स.स. श्रीमती शेख समिना शेख इलियास |
| ५२. | स.स. श्रीमती पठाण अस्मा फिरदोस रफीक पठाण |
| ५३. | स.स. श्री.जायभाय रमेश भानुदास |
| ५४. | स.स. श्री.शेख जफर अखतर |
| ५५. | स.स. श्रीमती गादगे शितल विरभद्र |
| ५६. | स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख |
| ५७. | स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब |
| ५८. | स.स. श्रीमती भालेराव आशा नरेश |
| ५९. | स.स. श्री.खैरे ऋषिकेश चंद्रकांत |
| ६०. | स.स. श्रीमती रेशमा अशफाक कुरेशी |
| ६१. | स.स. श्री.बारवाल गजानन रामकिसन |
| ६२. | स.स. श्रीमती बोर्डे सरीता अरुण |
| ६३. | स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर |
| ६४. | स.स. श्रीमती बनकर विजया संजय |
| ६५. | स.स. श्री.साळवी नितीन दशरथ |
| ६६. | स.स. श्रीमती विधाते अंकिता अनिल |

| | |
|---|---|
| ६७. | स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र |
| ६८. | स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत |
| ६९. | स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास |
| ७०. | स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद |
| ७१. | स.स. श्रीमती सत्यभामा दामुअण्णा शिंदे |
| ७२. | स.स. श्री.जगताप भाऊसाहेब उत्तमराव |
| ७३. | स.स. श्रीमती नरोटे कमल रामचंद्र |
| ७४. | स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव |
| ७५. | स.स. श्रीमती चव्हाण सुनिता रामराव |
| ७६. | स.स. श्री.गांगवे मनोज बन्सीलाल |
| ७७. | स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे |
| ७८. | स.स. श्रीमती साळवे अनिता मोहन |
| ७९. | स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब |
| ८०. | स.स. श्रीमती मिना रामदास गायके |
| ८१. | स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव |
| ८२. | स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम |
| ८३. | स.स. श्रीमती विमल गोविंद केंद्रे |
| ८४. | स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल |
| ८५. | स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ |
| ८६. | स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर |
| ८७. | स.स. श्रीमती निकाळजे लता मगन |
| ८८. | स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ |
| ८९. | स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद |
| ९०. | स.स. श्रीमती विमल जनार्धन कांबळे |
| ९१. | स.स. श्री.घोडेले नंदकुमार राधाकिसन |
| ९२. | स.स. श्रीमती मुल्ला सलीमा बेगम खाजोददीन |
| ९३. | स.स. श्रीमती शोभा गरुलिंगअप्पा बुरांडे |
| ९४. | स.स. श्रीमती सलीमा बाबुभाई कुरेशी |
| ९५. | स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण |
| ९६. | स.स. श्री.अप्पासाहेब विनायक हिवाळे |
| ९७. | स.स.कु.जमादार सायली भागवत |

**नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे**

१. श्री.शेख अब्दुल ताहेर अब्दुल करीम
२. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम
३. श्री.कांबळे चेतन जनार्धन

मा.महापौर :प्रश्न भरपुर आहेत. आठ दिवसांनतर प्रश्नांवर स्पेशल बैठक लावू. विषयपत्रिकेला सुरूवात करु.

**विषय क्रमांक ४४५:-** **(शहर अभियंता)**

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/ प्र.क्र.२४९/नवि-३४,दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेणे.

श्री.गजानन बारवाल :विषय क्र.४४५ नेमका काय आहे? खुलासा व्हावा.

कार्य.अभि.(युआयडीएसएसएमटी मलनि:स्सारण):खुलासा करतात.

श्री.राजु शिंदे :शौचालयाची माहिती देणे आवश्यक आहे याबाबत पाहणी करून विस्तृत प्रमाणात माहिती देणे आवश्यक होते.

श्री.गजानन बारवाल :विषयाबाबत माहिती देण्यात यावी.

श्री.कैलास गायकवाड :पुढील सभेमध्ये सविस्तर विषय ठेवण्यात यावा.

श्री.रेणुकादास वैद्य :पुढील सभेमध्ये सदरील विषय ठेवण्यात यावा.

मा.महापौर :स्वच्छता अभियानाचा सदरचा विषय सविस्तर पुढील सभेसमोर ठेवण्यात यावा.

श्री.मलके गोकुलसिंग :नारेगांवचा विचार करण्यात यावा. नारेगावचा समावेश यामध्ये करण्यात यावा.

मा.महापौर :स.सदस्यांनी जो मुद्या मांडलेला आहे त्याचा विचार करण्यात यावा.

**ठराव:-**

स्वच्छता अभियानाचा सदरचा विषय सविस्तर पुढील सभेसमोर ठेवण्यात यावा.

**विषय क्रमांक ४४६:-** **(कार्यकारी अभियंता,युआयडीएसएसएमटी-मलनि:सारण)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.उच्च न्यायालय मुंबई येथे मिळून साऱ्या जणी व इतर विरुध्द १४ महानगरपालिका, अशी रिट याचीका ९८/२०११ दाखल झालेली आहे. या दाखल याचीकेमध्ये शहरातील गर्दीच्या ठिकाणी फक्त महिलांसाठी महिलांना सुरक्षित वाटेल अशा ठिकाणी “पे ॲण्ड युज” पध्दतीवर वापरात यावयाचे शौचालय बांधणे बाबत मा.उच्च न्यायालयाचे निर्देश आहेत. या मध्ये न्यायालयाच्या आदेशानुसार या कामासाठी समिती गठित करण्यात आली असून समितीचे अध्यक्ष अतिरिक्त आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद हे असुन समिती मध्ये सभापती, स्थायी समिती, तसेच सभापती, महिला व बाल कल्याण, इतर महिला स.सदस्य, मुख्य आरोग्य वैद्यकीय अधिकारी, शहरातील नामांकित सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी (NGO) यांचा समावेश करण्यात आलेला आहे. या समितीची प्रथम बैठक दिनांक २२.२.२०१६ रोजी संपन्न झाली असुन या बैठकीत ठरल्यानुसार दिनांक २४.२.२०१६ रोजी शहरातील विविध ठिकाणी शौचालय बांधण्याची शक्यता तपासण्यासाठी समितीने पाहणी केली आहे. तसेच मा.उच्च न्यायालयाच्या आदेशा नुसार जनहित याचिका क्र ९८/२०११ मध्ये दिनांक ८.३.२०१६ रोजी महानगरपालिकेतर्फे अहवाल सादर करण्यात आला आहे. न्यायालयाच्या आदेशा नुसार शहरामध्ये विविध ठिकाणी शौचालय बांधणे आवश्यक असुन त्यासाठी सहा महिन्याच्या आत उल्लेखनीय कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने प्रकरणात महानगरपालिकेने कार्यवाही केली असुन अर्थसंकल्प सन २०१६-१७ मध्ये मा.महापौर, महानगरपालिका औरंगाबाद यांनी सुमारे रु.७५.०० लक्ष ची तरतुद केली आहे. या आर्थिक तरतुदीमधून शहरात खालील नमुद ठिकाणी शौचालय बांधण्यात येणार आहेत.

| अ.क्र | कामाचे नाव | अ.प. रक्कम |
|---|---|---|
| ०१ | ज्युबली पार्क येथील मनपा नुतन माध्यमिक शाळा परिसरात जुनी बंद | ११,७०,०००/- |

| | | |
|---|---|---|
| | पडलेली पाणपोई पाडून त्या ठिकाणी महिलांसाठी शौचालय बांधणे | |
| ०२ | पैठणगेट येथे मनपाच्या सय्यद मिरा सलामी हॉल व शॉपींग सेंटरच्या परिसरात महिलांसाठी शौचालय बांधणे | १६,५०,०००/- |
| ०३ | औरंगपुरा शहर बस थांब्याजवळ नाल्या लगत केवळ महिलांसाठी शौचालय बांधणे | ११,५८,०००/- |
| ०४ | एन-८, बॉटनिकल गार्डनच्या परिसरात पूर्व बाजुने महिलांसाठी शौचालय बांधणे | ११,७०,०००/- |
| ०५ | सेव्हन हिल येथील अग्निशमन कार्यालयाच्या परिसरात मुख्य रस्त्यालगत महिलांसाठी शौचालय बांधणे | ११,७०,०००/- |
| ०६ | बीबी का मकबरा परिसरात उपलब्ध होणाऱ्या जागेवर केवळ महिलांसाठी शौचालय बांधणे | ११,७०,०००/- |

उक्त कामास प्रशासकीय मान्यता दिनांक १.५.२०१६ रोजी प्रदान करण्यात आली आहे. या बांधण्यात येणाऱ्या शौचालयाच्या ठिकाणी महिला केअर टेकर व महिला सुरक्षा रक्षक ठेवण्यात येणार आहे. सदरचे शौचालय ३० वर्षासाठी चालविण्यासाठी द्यावयाचे योजीले असुन ज्या संस्थांना अशा स्वरुपाचे शौचालय ३० वर्षासाठी चालविण्यासाठी घेण्याचा अनुभव आहे, अशा संस्थांना सदर कामे देण्याबाबत निविदा मागविण्यात येणार आहेत. या ३० वर्ष कालावधीमध्ये शौचालय चालविण्यासाठी पुरेशा कुशल कामगारांची नेमणूक करणे, शौचालयाची देखभाल दुरुस्ती करणे, दर वर्षी येणारे विद्युत देयक व पाण्याचे देयक अदा करणे ची जबाबदारी सदरहू संस्थेची असेल. तरी, उक्त परिच्छेदात नमुद प्रमाणे अ.क्र १ ते ६ मधील ठिकाणी “पे ॲण्ड युज” पध्दतीवर चालणारे शौचालय बांधण्यासाठी निविदा मागविण्याचा व आवश्यक ठिकाणी जूनी इमारतीचे पाडकाम करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याचा तसेच आवश्यकता भासल्यास बीबीच्या मकबऱ्या जवळील खाजगी जागा शौचालया करीता महानगरपालिका खर्चाने चालू शिध्द् शीघ्र गणक दरानुसार जागा खरेदी करण्याचे अधिकार मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रदान करण्याचा प्रस्ताव अवलोकनास्तव तथा मंजुरीस्तव सादर.

श्री.गजानन बारवाल :कमिटीबाबत माहिती देण्यात यावी.

श्री.जागीरदार गुलाम जिलानी :प्रस्तावात दर्शविल्यानुसार अनुक्रमांक २ येथे शौचालय बांधलेले आहे. या ठिकाणी आवश्यकता नाही. Public Place नाही. तसेच अ.क्र.५ सेव्हन हिल महिला येत नाहीत. या दोन ठिकाणा ऐवजी शहागंज ते चौक दरम्यान शौचालय बनवायला हवा. अ.क्र. २ व ५ येथे आवश्यकता नाही.

श्रीमती माधुरी देशमुख :मिळुन सा-या जनी या संस्थेने रिट याचिका दाखल केली होती, सदरील मिटींगला हजर होते. महिलांसाठी स्वच्छतागृह नाही. सर्व सदस्य समितीने ही जागा सुचविलेली आहे. देवगीरी कॉलेजकडे जात असतांना तेथील शौचालयाची दुरावस्था झालेली आहे.सर्व पक्षाच्या सदस्यांनी या जागा सुचविलेले आहेत. मागच्या बाजुला शौचालय केले तर मनपाचे उत्पन्न वाढेल. उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टिने ही जागाही मोठी आहे. शहरात ज्या ज्या ठिकाणी महिलांसाठी शौचालयाची आवश्यकता आहे तीथे बनविण्यात यावे. स.सदस्यांनी सांगीतल्या प्रमाणे शहागंज व चौक भागात शौचालयाबाबत कोणचाही हरकत नाही.

| | |
|---|---|
| श्री.भादवे रामेश्वर | :पैठणगेट महानगरपालिकेची जागा आहे. तेथे महिलांसाठी समोरच्या भागात शौचालय बांधण्यात यावे. स्थळ बदलण्यात यावे. महानगरपालिकेच्या डिपीच्या बाजुला शौचालय बांधण्यात यावे. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :प्रस्तावास मंजुरी देण्यास हरकत नाही. शहरात शौचालयाची मोठ्या प्रमाणात गरज आहे. मोठया प्रमाणात फंड लागणार आहे.शहरात प्रत्येक वार्डामध्ये शौचालयाची आवश्यकता आहे त्यामुळे शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याकरीता सक्षम अधिकारी यांच्या कडून प्रस्ताव तयार करून शासनास पाठवावा. |
| श्री.गंगाधर ढगे | :अनुक्रमांक १ येथील पाणपोई बंद पडलेली नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा आहे. १०० मीटर दुर शौचालयाची व्यवस्था करण्यात यावी. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :या कामासाठी बजेटमध्ये रु.७५ लाख ठेवले आहे. असे नमुद आहे. सुलभ शौचालय बांधून ३० वर्षासाठी वापरायला दयायचे हा एक मार्ग आहे. सदर कामासाठी केंद्र किंवा राज्य शासनाचा निधी उपलब्ध होऊ शकते हे पाहायला पाहीजे. ३० वर्षाची जी अट टाकण्यात आलेली आहे ती टाकण्यात येऊ नये. |
| श्री.नंदकुमार घोडेले | :महिलांच्या शौचालयाचा महत्वाचा विषयावर चर्चा चालु आहे. चिकलठाणा ते नगरनाका या दरम्यान एकही शौचालय नाही. स.सदस्यांनी अनुक्रमांक ५ सेव्हन हिल येथील शौचालयास आक्षेप घेतलेला आहे.परंतु या परिसरात चार ते पाच कि.मी.पर्यंत शौचालय नाही. उडड्‌णपुलाच्या खाली विशेष बाबत म्हणुन शौचालय बांधण्यात यावे. मा.न्यायालयाचे वेळोवेळी आपल्याला आदेश ही देण्यात आलेले आहे. No Profit No Loss या तत्वावर शौचालय चालावावे, अशी धारणा आहे. कर्णपुरा उत्सव होतो. पंचवटी चौकात सुध्दा महिलांसाठी शौचालय बांधण्यात यावे. कलेक्टर ऑफिस ते रेल्वेस्टेशन परिसरात नगरनाका ते चिकलठाणा रेल्वेस्टेशन ते बसस्टॅड या भागात शौचालय बांधण्यात यावे. स.सदस्य श्री.राजगौरव वानखेडे यांनी सांगीतल्या प्रमाणे सुलभ इंटरनॅशनल त्याच्या माध्यमातुन चाचपणी करण्यात यावी. |
| श्रीमती सीमा खरात | :२०१६ साली मिळुन सा-या जनी यांची बैठक झाली होती त्यावेळेस सदर बैठकीस मी स्वत: हजर होते, टि.व्ही.सेंटर येथील क्रीडा संकुल येथे शौचालयाच्या मागच्या बाजुला दारुच्या बाटल्या असतात. संभाजी राजे क्रिडा संकुल आहे. त्या ठिकाणी नेहमी विविध क्रिडा स्पर्धा होतात. महिलांसाठी त्या ठिकाणी सुलभ शौचालयाची व्यवस्था करण्यात यावी. |
| श्रीमती सुनिता आऊलवार | :सदरील प्रस्ताव मंजूर करण्यात यावा. |
| श्री.कैलास गायकवाड | :मुकूंदवाडी रेल्वेस्टेशन येथुन अनेक प्रवासी येतात. त्या ठिकाणी सुलभ शौचालयाची व्यवस्था करण्यात यावी. ३० वर्षाच्या अनुभवाची अट संयुक्तीक नाही. ती अट शिथील करण्यात यावी. शहरात पुन्हा सर्वेक्षण |

करण्यात यावा. अस्तीत्वात असलेली मोडकळीस आलेले तुटलेले शौचालय दुरूस्ती करण्यात यावे.

श्री.विकास एडके :माझ्या वॉर्डात असलेले शौचालयात कुत्रे, जनावरे या शिवाय दुसरे कोणी जात नाही. सदरील शौचालय खुप घाण झालेले आहे. ३० वर्षाची अट शिथील करण्यात यावी. औरंगपुरा येथे शौचालयाची व्यवस्था करण्यात यावी.

श्री.राजु शिंदे :प्रस्तावास मंजुर करावा. अजुन या ठिकाणी आवश्यकता आहे. त्या ठिकाणी मनपाच्या नगरसेवकांच्या माध्यमातून महिलांसाठी शौचालय बांधण्यात यावे.

श्री.गांगवे मनोज :मुकूंदवाडी येथे सिडकोने भाजी मार्केटसाठी जागा ठेवलेली आहे, सर्वे झालेला आहे. त्या ठिकाणी शौचालयाची व्यवस्था करण्यात यावी. हा सर्व्हे प्रमाणित झाला आहे.

श्री.राजु शिंदे :विषय मंजूर करण्यात यावा. स.स.श्री.गंगाधर ढगे यांनी उपस्थित केलेल्या मुद्दाचा विचार करण्यात यावा ज्या ज्या ठिकाणी पुतळे असतील तेथे न बांधता दुस-या ठिकाणी बाधण्यात यावे. बाजारपेठयाच्या ठिकाणी शौचालयाची व्यवस्था करण्यात यावी. ३० वर्षाची अट बदलण्यात यावी.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर :माझ्या वॉर्डात असलेले हॉल या ठिकाणी शौचालय बांधण्यात यावे तेथे नेहमी कार्यक्रम होतात. विविध लोक येतात.

मा.महापौर :अफसर सिद्दीकी वाडकर यांच्या सुचनेची नोंद घ्या व तसे करता येईल ते बघा.

श्री.नाईकवाडी अब्दुल रहिम :बरेच जण शौचालय यांच्या जागी टपरी भाड्याने देतात. हे अटी व शर्ती मध्ये येते का?

श्री.सुरे सिताराम :टि.व्हि.सेंटर येथील सुलभ शौचालयाची देखभाल दुरूस्ती होत नाही. मोडकळीस आलेले सुलभ शौचालय दुरूस्त करण्यात यावे.

श्री.नाईकवाडी अब्दुल रहिम :शौचालयाची जागा टपरीसाठी भाड्याने देतात. जागा भाड्याने देता येते का?

श्रीमती निळकंठ अर्चना :प्रस्तावास अनुमोदन आहे. मेंन्टनन्सची अट यामध्ये टाकण्यात यावी.

मा.महापौर :स.सदस्यांची सूचनाचा विचार करण्यात यावा.र.रु.७५ लाख तरतुद आहे. शासनाकडून निधी येईल तात्काळ शौचालय करण्याची कार्यवाही करावी. वाढीव तरतुद आपण ठेवु. शहागंज हा मुख्य बाजारपेठ आहे. सेव्हनहिल येथे शौचालय न करता शहागंज येथे शौचालय करता येईल का? ते बघावे. तशी कार्यवाही करावी. विषय मंजुर. स.सदस्यांची मागणी विचारात घेता, तसेच जेथे मुख्य बाजारपेठ आहे.

महिलांचा जास्त वावर असतो, अशा ठिकाणच्या जागेला जास्तीत जास्त प्राधान्य दिले जावे तसेच रेल्वेस्टेशन मुकूंदवाडी व शहरातील इतर भागात असलेले जुने शौचालय आहे त्याची देखभाल दुरूस्ती करता येईल का? याचाही विचार करावा. नवीन ठिकाणी शौचालय करण्याकरीता केंद्र शासन व राज्य शासनाकडे निधी मागविता

येईल का? याचा विचार करावा. शौचालय चालविण्यासाठी ३० वर्षाची अट न ठेवता ओपन स्पर्धा व्हावी. जो चांगले चालविल त्यांना देण्यात यावे. चिकलठाणा ते नगरनाका हा मोठा रस्ता आहे. तसेच जिल्हाधिकारी कार्यालय ते रेल्वेस्टेशन रस्त्याला लागून असलेल्या परिसरात शौचालय बांधण्याबाबत विचार व्हावा. महिलांना सुरक्षितता मिळेल या दृष्टिने त्या-त्या आवश्यक ठिकाणी शौचालय बांधावे. तसेच टि.व्ही.सेंटर येथील जुने शौचालय तोडणार आहोत. तेथे शौचालय बांधतांना महिलांसाठी स्वतंत्र शौचालयाची व्यवस्था करावी. शौचालय बांधण्यासाठी रक्कम रुपये ७५ लक्षची तरतुद आहे आणखी वाढीव निधी ठेवता येईल. शासनाकडून निधी येईल. तात्काळ कार्यवाही करावी. सेव्हन हिल येथील अग्निशमन कार्यालयाच्या परिसरात मुख्य रस्त्यालगत महिलांसाठी शौचालय बांधणे प्रस्तावित आहे. त्याऐवजी शहागंज परिसरात शौचालय बांधण्याबाबत कार्यवाही करता येईल का? त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**<u>ठरावः-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील गर्दीच्या ठिकाणी फक्त महिलांसाठी महिलांना सुरक्षित वाटेल अशा ठिकाणी “पे ॲण्ड युज” पध्दतीवर वापरात यावयाचे शौचालय मा.न्यायालयाच्या आदेशा नुसार शहरामध्ये विविध ठिकाणी शौचालय बांधणे आवश्यक असुन त्यासाठी सहा महिन्याच्या आत उल्लेखनीय कार्यवाही करणे आवश्यक असल्याने त्या अनुषंगाने अर्थसंकल्प सन २०१६-१७ मध्ये रुपये ७५.०० लक्षची तरतुद केलेली असून या आर्थिक तरतुदीमधून शहरात प्रस्तावात नमुद केल्यानुसार खालील तक्त्यातील अ.क्र १ ते ६ मधील ठिकाणी “पे ॲण्ड युज” पध्दतीवर चालणारे शौचालय बांधण्यासाठी ३० वर्षाची अट न ठेवता ओपन स्पर्धा होऊन जो चांगले चालवेल त्याला चालविण्यासाठी निविदा मागविण्याचा व आवश्यक ठिकाणी जून्या इमारतीचे पाडकाम करण्यासाठी कार्यवाही करण्याचा तसेच आवश्यकता भासल्यास बीबीच्या मकबऱ्या जवळील खाजगी जागा शौचालया करीता महानगरपालिका खर्चाने चालू शिध्द् शीघ्रगणक दरानुसार जागा खरेदी करण्याचे अधिकार मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना देण्यास तसेच सभागृहात करण्यात आलेल्या सुचनेनुसार सेव्हनहिल येथील अग्निशमन कार्यालयाच्या परिसरात मुख्य रस्त्यालगत महिलांसाठी शौचालय बांधण्याऐवजी शहागंज परिसरात शौचालय बांधण्याबाबत कार्यवाही करता येत असेल तर त्यानुसार या प्रस्तावास नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र | कामाचे नाव | अ.प. रक्कम |
|---|---|---|
| ०१ | ज्युबली पार्क येथील मनपा नुतन माध्यमिक शाळा परिसरात जुनी बंद पडलेली पाणपोई पाडून त्या ठिकाणी महिलासाठी शौचालय बांधणे | ११,७०,०००/- |
| ०२ | पैठणगेट येथे मनपाच्या सय्यद मिरा सलामी हॉल व शॉपींग सेंटरच्या परिसरात महिलांसाठी शौचालय बांधणे | १६,५०,०००/- |
| ०३ | औरंगपुरा शहर बस थांब्याजवळ नाल्या लगत केवळ महिलांसाठी शौचालय बांधणे | ११,५८,०००/- |
| ०४ | एन-८ बॉटनिकल गार्डनच्या परिसरात पूर्व बाजुने महिलांसाठी शौचालय बांधणे | ११,७०,०००/- |

| | | |
|---|---|---|
| ०५ | सेव्हन हिल येथील अग्निशमन कार्यालयाच्या परिसरात मुख्य रस्त्यालगत महिलासाठी शौचालय बांधणे | ११,७०,०००/- |
| ०६ | बीबी का मकबरा परिसरात उपलब्ध होणाऱ्या जागेवर केवळ महिलांसाठी शौचालय बांधणे | ११,७०,०००/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४४७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सर्वसाधारण सभा दिनांक १२.०८.२००८ ठराव क्र.६४३/१ अन्वये मराठवाडा मुक्ती संग्रामात भाग घेणारे स्वातंत्र्य सेनानी भाऊसाहेब मोरे यांचा पुतळा कार्तिकी हॉटेल समोरील वाहतुक बेटाऐवजी मध्यवर्ती बसस्थानकालगत हायमास्ट शेजारी (८X८) जागेत उभारण्यास व शासनाकडे पुढील मंजुरीसाठी पाठविण्यास सर्वानुमते मान्यता झालेली आहे.

दरम्यान या प्रकरणी हॉटेल कार्तिकी चौकालगत असलेल्या वाहतुक बेटाच्या दुभाजकामधील कै.बाळासाहेब पवार यांच्या पुतळ्याच्या पाठीमागे असलेल्या उत्तरेकडील बाजुस बेटात उभारण्यासाठी मा.पोलिस आयुक्त, औरंगाबाद यांनी दिनांक १९.०४.२०१५ रोजी ना-हरकत पत्र दिले आहे.

करीता कार्तिकी चौकालगत असलेल्या वाहतुक बेटाच्या दुभाजकामधील कै.बाळासाहेब पवार यांच्या पुतळ्याच्या पाठीमागे असलेल्या वाहतुक बेटाच्या जागेत स्वातंत्र्य सेनानी भाऊसाहेब मोरे यांचा पुतळा उभारणेस आणि त्याबाबतचा ठराव शासनाकडे मंजुरीस्तव पाठविण्याच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक:- श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड,

अनुमोदक:-श्री. भगवान (बापु) देविदास घडमोडे, श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड, श्री.राजगौरव हरिदास वानखेडे, श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले, श्री.राहुल पंढरीनाथ सोनवणे, श्रीमती सरीता अरुण बोर्डे, श्री.शिवाजी भाऊसाहेब दांडगे, कु.सायली भागवत जमादार.

श्री.गजानन बारवाल :सदरचा विषय मंजूर करण्यात यावा. तसेच इतर पुतळयांबाबत महाराणा प्रताप, स्व.बाळासाहेब ठाकरे यांचे पुतळयाबाबत पाठपुरावा करण्यात यावा.

मा.महापौर :मंजुर समितीने इतर पुतळ्या बाबत तसेच स.सदस्य यांनी मांडलेल्या मुद्याचाही विचार समितीने करण्यात यावा.

मा.महापौर :विषय मंजुर. पुतळा समितीने योग्य तो निर्णय घ्यावा.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कार्तिकी चौकालगत असलेल्या वाहतुक बेटाच्या दुभाजकामधील कै.बाळासाहेब पवार यांच्या पुतळ्याच्या पाठीमागे असलेल्या वाहतुक बेटाच्या जागेत स्वातंत्र्य सेनानी भाऊसाहेब मोरे यांचा पुतळा उभारणेबाबत पुतळा समितीने योग्य तो निर्णय घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४४८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सैनिकी व नागरी सेवेवरील दोन कुटूंब निवृत्तीवेतने मंजुर करण्याबाबत महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक सेनिवे२०१३/प्रक्र६१/सेवा-४ दिनांक २७ एप्रिल-२०१५ नुसार माजी सैनिकांच्या कुटूंबास सैनिकी व नागरी अशा दोन्ही सेवेतील कुटूंब निवृत्तीवेतनाचा लाभ अनुज्ञेय केला आहे. हा लाभ राज्य शासनाच्या सेवेत पुनर्नियुक्त होणाऱ्या माजी सैनिकांच्या कुटूंबास लागु करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. माजी सैनिकाच्या कुटूंबाना हा लाभ

दि.२४.०९.२०१२ पासून देय होईल. जे माजी सैनिक २४.०९.२०१२ पुर्वी मृत्यु पावले त्यांच्या कुटूंबियांना देखिल सदरील लाभ २४.०९.२०१२ पासून लागू राहील असा शासन निर्णय आहे.

महानगरपालिका आस्थापनेवर एकूण ४७ माजी सैनिक असून त्यापैकी १५ माजी सैनिक मनपा आस्थापनेवर कार्यरत आहेत व २० सैनिक सेवानिवृत्त झालेले आहे आणि १२ सैनिक मृत्यु पावले असून त्यापैकी ०२ माजी सैनिकांच्या कुटूंबियांना उपरोक्त लाभ त्यांनी महापालिकेच्या निवृत्तीवेतनाची निवड केल्याने त्यांना देण्यात येत आहे. परंतू त्यावेळी शासन निर्णय नसल्यामुळे उर्वरीत १० माजी सैनिकांच्या कुटूंबियांना हा लाभ देण्यात येत नसल्याने ते या शासन निर्णयापासून वंचित आहेत. तरी शासन निर्णयानुसार या १० कुटूंबियांना शासन निर्णयाचा लाभ देणे आणि महानगरपालिकेच्या सेवेतील उर्वरीत माजी सैनिक साधारणतः ३५ सैनिकांना त्यांच्या मृत्युनंतर हा लाभ त्यांच्या कुटूंबियांना शासन निर्णयानुसार देण्यात यावा.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपूढे मंजुरीस्तव सादर.

**सुचकः-** श्री.राजगौरव हरिदास वानखेडे **अनुमोदकः-** श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड

**चर्चाः-**

श्री.राजगौरव हरिदास वानखेडे :केंद्र शासनाच्या तसेच राज्य शासनाच्या शासन निर्णयानुसार आपल्या महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील माजी सैनिकांना निवृत्त झाल्यानंतर किंवा मृत्यु पावल्यानंतर शासन निर्णयानुसार त्यांच्या कुटूंबियांना लाभ देण्यात यावा. विषय मंजुर करण्यात यावा.

मा.महापौर :विषय मंजुर, प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठरावः-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका आस्थापनेवरील १० माजी सैनिकांच्या कुटूंबियांना तसेच महानगरपालिकेच्या सेवेतील उर्वरित साधारणतः ३५ माजी सैनिकांना त्यांच्या मृत्युनंतर शासन निर्णयानुसार सैनिकी व नागरी सेवेतील माजी सैनिकांच्या मृत्युनंतर या दोन्ही सेवेतील कुटूंब निवृत्ती वेतनाचा लाभ नियमाप्रमाणे त्यांच्या कुटूंबियांना देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४४९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, देवळाई-सातारा परिसराचा महानगरपालिकेत समावेश करण्यात आलेला असुन या परिसरात अंदाजे एक लक्ष लोक राहतात. या रहिवाश्यांना कोणत्याही प्रकारच्या शासकीय वैद्यकीय सेवा उपलब्ध नसल्यामुळे या रहिवाश्यांना खाजगी दवाखान्यात उपचार घ्यावे लागतात. येथील बहुतांश रहिवासी हे आर्थिक दृष्ट्या मागासलेले असल्याने त्यांना वैद्यकीय सेवा उपलब्ध व्हावी यासाठी महानगरपालिकेतर्फे या परिसरात एक आरोग्य केंद्र उपलब्ध करुन देण्यात यावे.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपूढे मंजुरीस्तव सादर.

सुचकः- श्री.अप्पासाहेब विनायक हिवाळे अनुमोदकः- श्रीमती सत्यभामा दामुअण्णा शिंदे

**ठरावः-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, देवळाई-सातारा परिसराचा महानगरपालिकेत समावेश करण्यात आलेला असुन या परिसरातील नागरीकांसाठी वैद्यकीय सेवा मिळणे करीता महानगरपालिकेतर्फे एक आरोग्य केंद्र उपलब्ध करुन देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४५०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, देवळाई-सातारा परिसराचा महानगरपालिकेत समावेश करण्यात आलेला असुन या परिसरात अंदाजे एक लक्ष लोक राहतात. या परिसरातील रहिवाशीयांच्या मुलांना शासकीय शाळा उपलब्ध नसल्यामुळे खाजगी शाळेत शिक्षण घ्यावे लागत आहे. तसेच खाजगी

शाळेचा शैक्षणिक खर्च परवडत नसल्याने या रहिवाशीयांना महानगरपालिकेतर्फे मराठी माध्यमाची एक प्राथमिक शाळा त्वरीत सुरु करण्यात यावी, करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपूढे मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.अप्पासाहेब विनायक हिवाळे **अनुमोदक:-** श्रीमती सत्यभामा दामुअण्णा शिंदे

श्रीमती संगिता वाघुले :ठराव पास करण्यात येतो, परंतु अंमलबजावणी होत नाही, माझ्या वार्डातील शाळेसंबंधीचा प्रस्ताव मंजूर झालेला आहे. परंतु अंमलबजावणी झालेली नाही. सर्वे करून निर्णय घेणे बाकी आहे.

श्री.खान जहांगीर मुलानी :प्रस्तावाची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

श्री.कैलास गायकवाड :सदर प्रस्तावाबाबत प्रशासनाची काय भुमिका आहे? ते स्पष्ट करा.

श्री.खान जहांगीर मुलानी :सातारा-देवळाई भागात मराठी शाळेसोबतच उर्दु शाळा सुरू करण्यात यावी. त्या भागात मुस्लिम लोकसंख्या जास्त आहे.

मा.आयुक्त :प्राथमिक शिक्षण देणे ही मनपाची प्राथमिक जबाबदारी आहे.

श्रीमती संगिता वाघुले :शाळा सुरू करण्यासंदर्भात वार्डातील नागरीक वारंवार विचारणा करीत आहे. माझ्याकडे याबाबत काहीच उत्तर नाही.

श्री.कैलास गायकवाड :शासनाने शाळेला परवानगी देणे बंद केलेले आहे. याबाबत माहिती घेण्यात यावी.

श्री.राजु शिंदे :माझ्या वार्डात विद्यार्थ्यांची संख्या भरपूर आहे पण शिक्षक नाहीत. अशी सध्या महानगरपालिकेच्या शाळेची परिस्थिती आहे. नारेगाव येथे २२०० विद्यार्थी संख्या आहे. शिपाई, वॉचमन पाहिजे. आपण सर्व्हे करून ज्या ठिकाणी वर्ग ४ कर्मचाऱ्यांची आवश्यकता असेल त्या ठिकाणी त्वरीत व्यवस्था करण्यात आली पाहिजे.

श्रीमती किर्ती शिंदे :एकुण महानगरपालिकेच्या ७७ शाळा आहेत, शाळेवर जवळपास सव्वा कोटी रूपये खर्च होतात. प्रती विद्यार्थी १६०० ते १७०० रूपये खर्च येतो, मनपाच्या सर्व शाळा सेमी इंग्रजी करण्यात याव्यात. शिक्षक नुसतीच हजेरी लावतात, त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. खाजगी संस्थांना महानगरपालिकेच्या शाळा चालविण्यासाठी देण्यात याव्यात.

श्री.राजगौरव वानखेडे :शिक्षण विषयावर विशेष सभा घेण्यात यावी. ई-लर्नींग शिक्षण सेवा देण्यात यावी. ३३ स्टोअर रुम, ६६ कम्प्युटर एन-६ मनपाची मोठी शाळा आहे. त्या शाळेत ७०० ते ८०० विद्यार्थी शिक्षण घेत होते आता फक्त ४० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शिक्षणाचा स्तर उंचावण्यात यावा.

मा.महापौर :३० तारखेला पहिल्या आठवड्यात शिक्षण विषयावर विशेष सभा लावू. सर्वांच्या सूचनांचा विचार करण्यात येईल. मा.आयुक्तांनी तो पर्यंत शाळेचा सर्व्हे करावा. उर्दु माध्यमाची सुध्दा सुरूवात करण्यात यावी. सर्व समाजाच्या मुलामुलींना शिक्षण घेता यावे.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, देवळाई-सातारा परिसराचा महानगरपालिकेत समावेश करण्यात आलेला असुन येथील रहिवाशीयांच्या मुलांना महानगरपालिकेतर्फे मराठी माध्यमाची एक प्राथमिक शाळा सुरु करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४५१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत वॉर्ड क्र.०३ एकतानगर वसाहतीमध्ये जवळपास ७५ टक्के दलित समाजाचे रहिवासी राहत असल्याने शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत खालील विकास कामे केल्यास त्यांचे राहणीमान व दैनंदिन मुलभूत सुविधा देण्यासाठी खालील कामे करणे अत्यंत आवश्यक असल्याने त्या कामासाठी निधी मिळविण्यास शासनाकडे शिफारस करण्यास प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सविनय सादर.

१. वॉर्ड क्र.०३ एकतानगर येथे विविध ठिकाणी काँक्रेटिंग करणे-अंदाजे रक्कम रुपये ६० लक्ष.
२. वॉर्ड क्र.०३ एकतानगर येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे, चेम्बर बांधणे व जुनी लाईन दुरूस्ती करणे-अंदाजे रक्कम रुपये ३० लक्ष.
३. वार्ड क्र.०३ एकतानगर येथे विविध ठिकाणी विद्युत व्यवस्था करणे अंतर्गत नवीन पोलसह लाईट लावणे-अंदाजे रक्कम रूपये २५ लक्ष

**सुचक:-** श्री.रुपचंद लक्ष्मण वाघमारे

**अनुमोदक:-** श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले,श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड.

श्री.गजानन बारवाल :विषय ४५१ ते ४५८, ४५९ हे सर्व विषय मंजुर करावे. भगवान महावीर पुल तयार करण्यात आलेला आहे. २० तारखेला उद्घाटन आहे या ठिकाणी बोर्ड लावण्यात यावे.

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत वॉर्ड क्र.०३ एकतानगर वसाहतीमध्ये खालील दर्शविलेली विविध विकास कामांसाठी निधी उपलब्ध होणेसाठी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते.

१. वॉर्ड क्र.०३ एकतानगर येथे विविध ठिकाणी काँक्रेटिंग करणे-अंदाजे रक्कम रुपये ६० लक्ष.
२. वॉर्ड क्र.०३ एकतानगर येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे, चेम्बर बांधणे व जुनी लाईन दुरूस्ती करणे-अंदाजे रक्कम रुपये ३० लक्ष.
३. वार्ड क्र.०३ एकतानगर येथे विविध ठिकाणी विद्युत व्यवस्था करणे अंतर्गत नवीन पोलसह लाईट लावणे-अंदाजे रक्कम रूपये २५ लक्ष.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४५२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.९६ मधील मनपाच्या मालकीची पहाडेपुष्प व विजयनगर गारखेडा (सर्व्हे नं.५१ चा भाग) यांच्यामधील असणाऱ्या खुल्या जागेस “स्व.खा.मोरेश्वर सावे शैक्षणिक व क्रिडा सांस्कृतिक संकुल” असे नाव देण्यात यावे. अशी परिसरातील नागरीकांची इच्छा आहे.

स्व.खा.मोरेश्वर सावे यांचे शहरातील योगदान लक्षात घेऊन त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ सदरील खुल्या जागेवरील प्रवेशद्वारास “स्व.खा.मोरेश्वर सावे शैक्षणिक व क्रिडा सांस्कृतिक संकुल” असे नाव देण्याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती विमल गोविंद केंद्रे **अनुमोदक:-**श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.९६ मधील मनपाच्या मालकीची पहाडेपुष्प व विजयनगर गारखेडा (सर्व्हे नं.५१ चा भाग) यांच्यामधील असणाऱ्या खुल्या जागेस "स्व.खा.मोरेश्वर सावे शैक्षणिक व क्रिडा सांस्कृतिक संकुल" असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४५३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०१ फुलेनगर येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक असून पीरबाजार चौक ते एकता चौक या रोडला भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्याची मागणी या भागातील नागरीकांनी केली असून नागरीकांच्या भावनेचा आदर ठेवुन सदरील मार्गास "भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग" असे नाव देण्याबाबत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**सुचक:-**श्रीमती लता मगन निकाळजे

**अनुमोदक:-**श्रीमती ज्योती जयेश अभंग, श्री.राहूल पंढरीनाथ सोनवणे, श्रीमती सुनिता रामराव चव्हाण.

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१०१ फुलेनगर येथील पीरबाजार चौक ते एकता चौक या मार्गास "भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग" असे नाव देण्यासाठी नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४५४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०१ फुलेनगर ही वसाहत असून या ठिकाणी दलित कष्टकरी समाज मोठ्या संख्येने राहतो. तसेच म.फुलेनगर या वसाहतीमधून आनंदगाडे चौक मुख्य रस्ता गेलेला असून या मुख्य रस्त्यावर मनपाकडून भव्य असे प्रवेशद्वार बांधून ह्या प्रवेशद्वारास सपुंर्ण जगाला शांतीचा संदेश देणारे महाकारूणीक "तथागत गौतमबुध्द मुख्य प्रवेशद्वार" असे नाव देण्यात यावे अशी मागणी या भागातील नागरीकांनी केली असून नागरीकांच्या भावनेचा आदर ठेऊन सदरील ठिकाणी मनपाकडून भव्य असे प्रवेशद्वार बांधून ह्या प्रवेशद्वारास सपुंर्ण जगाला शांतीचा संदेश देणारे महाकारूणीक "तथागत गौतमबुध्द मुख्य प्रवेशद्वार" असे नाव देण्यात यावे.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**सुचक:-**श्रीमती लता मगन निकाळजे

**अनुमोदक:-**श्रीमती ज्योती जयेश अभंग, श्री.राहूल पंढरीनाथ सोनवणे, श्रीमती सुनिता रामराव चव्हाण.

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१०१ फुलेनगर येथील आनंदगाडे चौक या मुख्य रस्त्यावर मनपाकडून भव्य असे प्रवेशद्वार बांधून ह्या प्रवेशद्वारास महाकारूणीक "तथागत गौतमबुध्द मुख्य प्रवेशद्वार" असे नाव देण्यासाठी नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४५५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.१०१ येथे एकनाथनगर ही वसाहत असून या वसाहतीत मनपातर्फे नागरीकांच्या सुविधेसाठी मोकळा भुखंड उद्यानासाठी सोडण्यात आला असून गेल्या अनेक वर्षापासून या भुखंडावर मनपा प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नागरीकांची गैरसोय होत असून या ठिकाणी या मोकळ्या भुखंडावर संरक्षण भींत (वाल कंपाऊंड) बांधून या ठिकाणी गार्डन विकसीत करून

जॉगींग ट्रॅक तयार करून या उद्यानास थोर समाज सुधारक “महात्मा ज्योतीबा फुले उद्यान” असे नाव देण्यात यावे. अशी मागणी या भागातील नागरीक गेल्या अनेक वर्षापासून करीत असून नागरीकांच्या भावनेचा आदर ठेऊन सदरील ठिकाणी मनपाकडून नागरीकांच्या सुविधेसाठी मोकळा भुखंड उद्यानासाठी सोडण्यात आलेल्या भुखंडावर संरक्षण भींत बांधून या ठिकाणी उद्यान विकसीत करून जॉगींग ट्रॅक तयार करून या उद्यानास थोर समाज सुधारक “महात्मा ज्योतीबा फुले उद्यान” असे नाव देण्याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**सुचकः-**श्रीमती लता मगन निकाळजे

**अनुमोदकः-**श्रीमती ज्योती जयेश अभंग,श्री.राहूल पंढरीनाथ सोनवणे,श्रीमती सुनिता रामराव चव्हाण.

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठरावः-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.१०१, एकनाथनगर येथे मनपाकडून नागरीकांच्या सुविधेसाठी, उद्यानासाठी सोडण्यात आलेल्या मोकळ्या भुखंडावर संरक्षण भींत बांधून या ठिकाणी उद्यान विकसीत करून जॉगींग ट्रॅक तयार करून या उद्यानास थोर समाज सुधारक “महात्मा ज्योतीबा फुले उद्यान” असे नाव देण्यासाठी नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४५६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०१ फुलेनगर येथे मनपाचा ४०X५० चा मोकळा भुखंड नागरीकांच्या सुविधेसाठी समाज मंदीरासाठी सोडण्यात आला असून या भुखंडावर मनपा तर्फे सामाजिक सभागृह बांधण्यात यावे व या सभागृहास “माता रमाई आंबेडकर सामाजिक सभागृह” असे नाव देण्यात यावे. अशी मागणी या भागातील नागरीकांनी केली असून नागरीकांच्या भावनेच्या आदर ठेऊन नागरीकांच्या सुविधेसाठी मनपाच्या मोकळ्या जागी सामाजिक सभागृह बांधून या सभागृहास आंबेडकरी चळवळीचे श्रध्दास्थान असलेल्या “माता रमाई आंबेडकर सामाजिक सभागृह” असे नाव देण्याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**सुचकः-**श्रीमती लता मगन निकाळजे.

**अनुमोदकः-**श्रीमती ज्योती जयेश अभंग, श्री.राहूल पंढरीनाथ सोनवणे, श्रीमती सुनिता रामराव चव्हाण.

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठरावः-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१०१ फुलेनगर येथे मनपाकडून नागरीकांच्या सुविधेसाठी सोडण्यात आलेल्या मोकळ्या भुखंडावर मनपा तर्फे सामाजिक सभागृह बांधण्यास व या सभागृहास “माता रमाई आंबेडकर सामाजिक सभागृह” असे नाव देण्यासाठी नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४५७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३५ अंतर्गत नारेगाव गल्ली नं.०१ पाण्याच्या टाकी जवळील उद्यानाला “स्व.सोरमबाई संपतसिंग मलके” असे नाव देण्यात यावे.

करीता सदर प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचकः-**श्री.गोकुळसिंग संपतसिंग मलके **अनुमोदकः-**श्री.राजु रामराव शिंदे

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३५ अंतर्गत नारेगाव गल्ली नं.०१ पाण्याच्या टाकी जवळील उद्यानाला "स्व.सोरमबाई संपतसिंग मलके" असे नाव नियमाप्रमाणे देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४५८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.४१ (जुने वॉर्ड क्र.४५) करीता महानगरपालिका अर्थसंकल्प सन २०१६-१७ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्यात यावे म्हणून प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

| पान क्र. | लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| वॉर्ड-क, स्पील पान क्र.२४ | वॉर्ड क्र.४५ रहेमानिया कॉलनी येथे तसेच यशोधरा कॉलनी मुख्य रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणे.<br>आर्थिक तरतुद ७.५० लक्ष | वॉर्ड क्र.४१ रहेमानिया कॉलनी अंतर्गत यशोधरा कॉलनी येथील श्री.अब्दुल भाई यांच्या घरापासून ते श्री ढेपे साहेब यांच्या घरापर्यंत ट्रि-मिक्स कॉँक्रेटींग करणे.<br>या कामासाठी सदरील तरतुद वळती करण्यात यावी. |

सुचक:- श्री.खान इरशाद इब्राहिम अनुमोदक:- श्रीमती शेख समिना शेख इलियास

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४१ (जुने वॉर्ड क्र.४५) येथे अर्थसंकल्प सन २०१६-१७ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| पान क्र. | लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| वॉर्ड-क, स्पील पान क्र.२४ | वॉर्ड क्र.४५ रहेमानिया कॉलनी येथे तसेच यशोधरा कॉलनी मुख्य रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणे.<br>आर्थिक तरतुद ७.५० लक्ष | वॉर्ड क्र.४१ रहेमानिया कॉलनी अंतर्गत यशोधरा कॉलनी येथील श्री.अब्दुल भाई यांच्या घरापासून ते श्री ढेपे साहेब यांच्या घरापर्यंत ट्रि-मिक्स कॉँक्रेटींग करणे.<br>या कामासाठी सदरील तरतुद वळती करण्यात यावी. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४५९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०५ मध्ये पैठण रोड उड्डाणपुल ते राहुलनगर स्मशानभुमी पर्यंत हाच एकमेव मुख्य रस्ता आहे. वॉर्डात येण्यासाठी दुसरा कोणताही रस्ता उपलब्ध नाही. करीता सदरील रस्त्याचे काम करण्यास येथे रुंदीकरण करणे आवश्यक आहे. परंतु मनपाच्या संबंधीत विभागाकडून मार्किंग होत नसल्याने येथे कोणत्याही प्रकारची विकास कामे करता येत नाही ज्यामुळे रहिवासीयांना रहदारी तथा वाहतुकीस फार त्रास होत आहे.

करिता, रहिवासीयांना होणारा त्रास दुर करण्यासाठी पैठण रोड उड्डाणपुल ते राहुलनगर स्मशानभुमी पर्यंत मुख्य रस्त्याची मार्किंग करुन देण्यास संबंधित विभागास आदेशित करण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.अब्दुल नवीद अब्दुल रशीद **अनुमोदक:-** श्री.अफसर खॉन यासीन खॉ

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पैठण रोड उड्डाणपुल ते राहुलनगर स्मशानभुमी पर्यंत मुख्य रस्त्याची नियमाप्रमाणे मार्किंग करुन देण्यास व या रस्त्याचे रुंदीकरणाचे काम करण्यास मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ४६०:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३६, नारेगांव, ब्रिजवाडी, मनपा प्राथमिक शाळेच्या पहिल्या मजल्यावर अतिरिक्त खोल्या बांधण्यात याव्या. शौचालया ऐवजी अतिरिक्त खोल्या बांधून देण्यात याव्यात.

कारण यावर्षी एकूण विद्यार्थी संख्या २२०० इतकी झाली आहे. ऊर्दु माध्यमाचे दोन वर्ग वाढल्यास वर्ग खुपच अपुरे पडतात. सदरील कामास रु.१०,००,०००/- मंजुर आहे.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप **अनुमोदक:-**श्री.नितीन रमन चित्ते

श्री.अब्दुल नावीद :माझ्या वार्डातुन एकच मार्ग आहे जाण्या येण्यासाठी. मार्कींग केली गेली पाहिजे. यावर निर्णय घेतलेला नाही.

श्री.अजीम अहेमद :कटकट येथील मार्कींग बाबत वारंवार चर्चा केलेली आहे परंतु निर्णय घेण्यात येत नाही.

सहा.संचालक न.र. :प्रत्यक्ष जागेवर जाऊन पहाणी करून कार्यवाही करण्यात येईल.

मा.महापौर :तीन दिवसांत मार्किंग करण्यात यावी.

श्रीमती सुरेखा सानप :अतिरीक्त खोल्या बांधण्यात याव्यात.

श्री.राजु शिंदे :संरक्षक भींत तोडून अतिक्रमणे करण्यात आली आहेत.

श्रीमती सुरेखा सानप :बजेटमध्ये तरतुद आहे. १०२ विद्यार्थी आहेत. तेथे शौचालयाऐवजी अतिरीक्त खोल्या त्वरीत बांधण्यात याव्यात. ९ वीचा वर्ग तातडीने सुरू करण्यात यावा.

श्री.राजेंद्र जंजाळ :अतिक्रमण काढुन विषय मंजूर करण्यात यावा.

मा.आयुक्त :नवीन ९ वीचा वर्ग सुरू करण्यात हरकत नाही. पण सध्या शिक्षक संख्या कमी आहे. याबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात येणार आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :सक्षम शिक्षणाधिकारी लवकरात लवकर देण्यात यावा.

मा.आयुक्त :याबाबत शासनाला कळविलेले आहे, चर्चा झालेली आहे लवकरच शिक्षणअधिकारी मिळेल.

श्री.नंदकुमार घोडेले :डेप्युटेशनवर शिक्षणाधिकारी येण्यास तयार नसेल तर जशी झु-मध्ये भरती केली. त्याचप्रमाणे शिक्षणधिकारी यांची जाहिरात देवुन नियुक्ती करण्यात यावी.

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३६, नारेगांव, ब्रिजवाडी महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेच्या पहिल्या मजल्यावर शौचालया ऐवजी अतिरिक्त खोल्या नियमानुसार बांधण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४६१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेच्या नारेगांव येथील मनपा शाळेत ८ वी पर्यंत मराठी माध्यम व ऊर्दु माध्यमाचे वर्ग आहेत. या शाळेत ऊर्दु माध्यमाच्या मुलांची व मुलींची संख्या जास्त आहे. या ठिकाणी पुढील नववी व दहावीचे वर्ग नसल्याने येथील मुले शिक्षणापासून वंचीत राहत आहे.

या विद्यार्थ्यांची पूढे गैरसोय होवू नये याकरीता सन २०१६-२०१७ पासून नारेगांव येथील महापालिकेच्या शाळेत इयत्ता ९ वी व १० वीचे वर्ग सुरु करण्यासाठी नव्याने वर्ग बांधून देण्यात यावे.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप **अनुमोदक:-** श्री.नितीन रमन चित्ते

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या नारेगांव येथील मनपा शाळेत सन २०१६-२०१७ पासून इयत्ता ९ वी व १० वीचे वर्ग सुरु करण्यासाठी नवीन वर्ग बांधून देण्यास नियमानुसार मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४६२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३६, नारेगांव भागातील राजेंद्रनगर परिसरात येणाऱ्या दलित वसाहतीमध्ये शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत खालील कामाकरीता निधी प्राप्त होण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव पाठविण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र | कामाचे नांव | अंदाजे तरतुद |
|---|---|---|
| १. | राजेश बियर बार ते गणपती मंदिरापर्यंत कॉंक्रेट रस्ता तयार करणे | १०,००,०००/- |
| २. | सरोदे कॉम्प्लेक्स ते अशोक विधाते यांच्या घरापर्यंत कॉंक्रेट रस्ता तयार करणे | १०,००,०००/- |
| ३. | काकडे कॉम्प्लेक्स ते श्री.कवडे पाटील घरापर्यंत कॉंक्रेट रस्ता तयार करणे | १०,००,०००/- |

**सुचक:-** श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप **अनुमोदक:-** श्री.नितीन रमन चित्ते

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३६, नारेगांव भागातील राजेंद्रनगर परिसरात येणाऱ्या दलित वसाहतीमध्ये शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे खालील कामांकरीता निधी प्राप्त होण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव पाठविण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र | कामाचे नांव | अंदाजे तरतुद |
|---|---|---|
| १. | राजेश बियर बार ते गणपती मंदिरापर्यंत कॉंक्रेट रस्ता तयार करणे | १०,००,०००/- |
| २. | सरोदे कॉम्प्लेक्स ते अशोक विधाते यांच्या घरापर्यंत कॉंक्रेट रस्ता तयार करणे | १०,००,०००/- |
| ३. | काकडे कॉम्प्लेक्स ते श्री.कवडे पाटील घरापर्यंत कॉंक्रेट रस्ता तयार करणे | १०,००,०००/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४६३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका सर्वसाधारण सभा दिनांक १८.०७.२००७ रोजीचा मंजुर ठराव क्र.८८८/१२ नुसार ज्युबली पार्क येथील ट्रॅफिक सिग्नल शेजारील

दगडी बेटाच्या जागेवर राष्ट्रीय महाकवी वामनदादा कर्डक यांचा पुतळा उभारण्यास मंजुरी देण्यात आलेली होती. तसेच सन २००८-०९ च्या अर्थसंकल्पात पुतळे खरेदी व देखभाल लेखाशिर्ष अंतर्गत रक्कम रुपये १० लक्षाची तरतुद सुध्दा करण्यात आलेली होती. तथापी, आजपर्यंत संबंधीत विभागाकडून मंजुर ठरावावर कार्यवाही झालेली नाही. तसेच सदरील जागा आजपर्यंत अंतिम करण्यात आलेली नाही. मंजुर ठरावानुसार जागा अंतिम करुन पुतळा बसविण्यात यावा.

सर्वसाधारण सभा ही सर्वोच्च सभा असून या सभेचा निर्णय अंतिम असतो. परंतु मनपा प्रशासन वामनदादा कर्डक यांचे बाबतीत का उदासिन भावना ठेवून काम करीत आहे हे कळत नाही. करीता मा.महापौरांनी सन-२००७ मध्ये आदेश वजा ठराव मंजुर केल्याने प्रशासनाने यावर तात्काळ पुढील कार्यवाही करुन वामनदादा कर्डक यांचा पुतळा ज्युबली पार्क येथे बसविण्यात यावा म्हणून मंजुर ठरावावर कार्यवाही करण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.गंगाधर नामदेव ढगे **अनुमोदक:-** श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन

मा.महापौर :विषय मंजुर, प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका सर्वसाधारण सभा दिनांक १८.०७.२००७ रोजीचा मंजुर ठराव क्र.८८८/१२ नुसार ज्युबली पार्क येथील ट्रॅफिक सिग्नल शेजारील दगडी बेटाच्या जागेवर राष्ट्रीय महाकवी वामनदादा कर्डक यांचा पुतळा बसविण्या बाबत प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४६४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शासन निर्णय क्र.संकीर्ण/२०१२/प्र.क्र.१४१/आरोग्य-३/ मंत्रालय, मुंबई, दिनांक १७ जानेवारी २०१३ अन्वये आरोग्य संस्था स्थापनेच्या बृहत आराखड्यानुसार औरंगाबाद शहरासाठी २०० खाटांचे महिला व नवजात शिशु रुग्णालय स्थापन करण्यास मंजुरी मिळालेली आहे. सदर रुग्णालय स्थापन करण्यासाठी औरंगाबाद शहरा अंतर्गत सातारा परिसरात ७ एकर जागा उपलब्ध करण्याची विनंती जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, औरंगाबाद यांनी त्यांच्या दिनांक १६.०४.२०१६ च्या पत्रान्वये केली आहे. तसेच मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनीही त्यांच्या दिनांक २९ एप्रिल-२०१६ च्या पत्रान्वये केलेली आहे.

उपरोक्त विनंतीच्या अनुषंगाने सातारा परिसरातील गट नं.३२६,गट नं.२८३, गट नं.३३०/२,गट नं.३३०/२८, गट नं.७३ यापैकी एका गटातील ७ एकर जमीन (जागा) उपलब्ध आहे.

करिता सातारा परिसरातील सदर जागेत शासनाचे महिला व नवजात शिशु रुग्णालय स्थापनेसाठीचा ठराव शासनाकडे मंजुरीस्तव पाठविण्याच्या मान्यतेस्तव प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**सुचक:-** कु.सायली भागवत जमादार **अनुमोदक:-** श्री.सोहेल शकील शेख

कु.सायली जमादार :प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गट नं. ३२६, २८३, ३३०/२, ३३०/२८, गट नं. ७३ मध्ये ७ एकर जागा रूग्णालय साठी उपलब्ध आहे.

श्री.गजानन बारवाल :सातारा ठिकाणी जी जागा योग्य वाटेल ती घेण्यात यावी.

मा.महापौर :निकम साहेब या बाबत शासनाच्या नियमांचे पालन होणे आवश्यक आहे. पुर्ण नियमाप्रमाणे रितसर प्रस्ताव तयार करावा. नियमाप्रमाणे कार्यवाही व्हावी. हा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. या जागेसंबंधी मा.जिल्हाधिकारी तसेच मा.पालकमंत्री यांचेही पत्र आहे. हा प्रस्ताव

मंजुर करण्यात येतो. प्रशासनाने सदरील प्रकरणी नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासन निर्णय क्र.संकीर्ण/२०१२/प्र.क्र.१४१/आरोग्य-३/ मंत्रालय मुंबई दिनांक १७ जानेवारी २०१३ अन्वये औरंगाबाद शहरासाठी २०० खाटांचे महिला व नवजात शिशु रुग्णालय सातारा परिसरातील उपलब्ध असलेल्या गट नं.३२६,गट नं.२८३, गट नं.३३०/२,गट नं.३३०/२८, गट नं.७३ यापैकी एका गटातील ७ एकर जमीन (जागा) वर स्थापनेसाठीचा ठराव शासनाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**ऐनवेळीचे विषय**

मा.महापौर :ऐनवेळीचे विषय आलेले आहेत. ते सर्व मंजुर करण्यात येतात.

**विषय क्रमांक ४६५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.११२, शिवाजीनगर येथील वाणी मंगल कार्यालय ते फोस्टर स्कुल पर्यंतचा रस्ता अतिशय खराब झालेला असून त्यामुळे नागरीकांना मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे. सदर रस्ता (व्हाईट टॉपींग) मजबुतीकरण करण्यासाठी अंदाजे रक्कम रुपये १.०० कोटी खर्च अपेक्षीत असून नगरोत्थान निधीतून मा.पालकमंत्री महोदय यांनी ५० लक्ष रुपये देण्याबाबतची शिफारस करणे बाबत प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.राजेंद्र हिम्मतराव जंजाळ

**अनुमोदक:-** श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत, श्री.घोडेले नंदकुमार राधाकिसन.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.११२, शिवाजीनगर येथील वाणी मंगल कार्यालय ते फोस्टर स्कुल पर्यंतचा रस्ता (व्हाईट टॉपींग) मजबुतीकरण करण्यासाठी नगरोत्थान निधीतून मा.पालकमंत्री महोदय यांनी ५० लक्ष रुपये देण्याबाबतची शिफारस करणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४६६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका सर्वसाधारण सभा दिनांक १८.०१.१९९९ नुसार ज्या कर्मचाऱ्यांचे पती किंवा पत्नी महानगरपालिका सेवेत आहेत. त्यांना महानगरपालिकेच्या सेवेत सामावून घेता येईल. पती/पत्नी एकत्रीकरणाच्या संदर्भात श्रीमती मोहिनी नारायण बर्डे हया महानगरपालिकेच्या प्रा.शा.नारेगांव या ठिकाणी सहशिक्षक पदावर कार्यरत आहेत. त्यांचे पती श्री.तुकाराम मच्छिंद्र मराठे हे सहशिक्षक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काळसे धामापूर ता.मालवण जि.सिंधूदुर्ग या ठिकाणी कार्यरत असून त्यांची सेवा महानगरपालिका औरंगाबादकडे वर्ग करणेबाबत जिल्हा परिषद सिंधुदूर्ग यांनी ना-हरकत प्रमाणपत्र दिलेले आहेत.

तरी श्री.तुकाराम मच्छिंद्र मराठे, सहशिक्षक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काळसे, धामापूर ता.मालवण जि.सिंधुदूर्ग यांना महानगरपालिकेच्या सेवेत सामावून घेणे बाबत नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक:- श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले अनुमोदक:-श्री. गायकवाड कैलास लक्ष्मण

मा.महापौर :विषय मंजुर, प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळा, नारेगांव या ठिकाणी सहशिक्षक पदावर कार्यरत असलेल्या श्रीमती मोहिनी नारायण बर्डे यांचे पती श्री.तुकाराम मच्छिंद्र मराठे,सहशिक्षक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काळसे, धामापूर ता.मालवण जि.सिंधुदूर्ग यांना पती-पत्नी एकत्रिकरणाच्या संदर्भात जिल्हा परिषद, सिंधुदूर्ग यांनी ना-हरकत प्रमाणपत्र दिलेले असल्याने त्यांना औरंगाबाद महानगरपालिकेच्या सेवेत सामावून घेणे बाबत नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४६७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नंदनवन कॉलनी येथील महात्मा फुले स्मृतीस्तंभ लगतच्या भुजबळनगर कडे जाणाऱ्या रस्त्यावर भव्य आर.सी.सी. प्रवेशद्वार उभारुन त्यास स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या आद्य शिक्षिका क्रांतीज्योती, “माता सावित्रीबाई फुले” यांचे नांव देण्यात यावे अशी मागणी परिसरातील महिला व नागरीकांकडुन मोठ्या प्रमाणात होत आहे.

करीता आर.सी.सी. प्रवेशद्वार (कमान) उभारून त्यास “माता सावित्रीबाई फुले प्रवेशद्वार” असे नांव देण्यात यावे करीता, प्रस्ताव मंजुरीस्तव सर्वसाधारण सभेसमोर सादर.

सुचक:- श्रीमती प्रेमलता मिलिंद दाभाडे

अनुमोदक:- श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड, श्री.दिलीप गंगाधर थोरात.

मा.महापौर :विषय मंजुर, प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नंदनवन कॉलनी येथील महात्मा फुले स्मृतीस्तंभा लगतच्या भुजबळनगर कडे जाणाऱ्या रस्त्यावर भव्य आर.सी.सी. प्रवेशद्वार (कमान) नियमाप्रमाणे उभारण्यास व सदरील कमानीला “ माता सावित्रीबाई फुले प्रवेशद्वार” असे नांव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४६८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.१७, नंदनवन कॉलनी येथील विवेकानंद इंग्लीश स्कुल समोरील चौकाला बहुजनांचे न्यायदाते “राजे छत्रपती शिवाजी महाराज” असे नाव देण्यात यावे. अशी मागणी प्रभागातील नागरीक सातत्याने करीत आहेत.

करीता सदरील चौकाला “राजे छत्रपती शिवाजी महाराज” असे नाव देऊन १० लक्ष रुपये खर्चुन चौकाचे सुशोभीकरण करण्यात यावे. यासाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सर्वसाधारण सभेसमोर सादर.

सुचक:- श्रीमती प्रेमलता मिलिंद दाभाडे

अनुमोदक:-श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड, श्री.दिलीप गंगाधर थोरात, श्री.राजगौरव हरीदास वानखेडे

मा.महापौर :विषय मंजुर, प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.१७ नंदनवन कॉलनी येथील विवेकानंद इंग्लीश स्कुल समोरील चौकाचे सुशोभिकरण करण्यासाठी येणाऱ्या रक्कम रुपये १० लक्ष खर्चास नियमाप्रमाणे मंजुरी देण्यात येते तसेच सदरील चौकास बहुजनांचे न्यायदाते “राजे छत्रपती शिवाजी महाराज” असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४६९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जालना रोडवर उड्डाणपुलाचे काम चालू असल्यामुळे एस.टी.महामंडळाच्या बसेस मारुती ॲटोमोटीव्हपासून एन-१ टाऊन सेंटरच्या परिसरातून रहिवासी क्षेत्रातील अंतर्गत रस्त्यावरून जळगाव रोड, सिडको बस स्टँण्डला येत आहेत. आता उड्डाणपुलाचे काम पुर्ण झालेले आहे. तरीसुध्दा महामंडळाच्या एस.टी.बसेस पुर्वीप्रमाणेच येत आहेत. दरम्यान सिडकोच्या बस स्टॅण्डच्या कंपाऊंडवॉलला अक्षयदिप प्लाझाच्या पाठीमागे असलेल्या ठिकाणी महामंडळातर्फे दुसरे गेट करण्याकरीता प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे या परिसरातील रहिवासी क्षेत्रातील नागरीकांच्या तक्रारी येत आहेत.

सदरील गेटचे काम झाल्यास एस.टी.महामंडळाच्या बसेस मारुती ॲटोमोटीव्हपासून एन-१ टाऊन सेंटरच्या परिसरातून रहिवासी क्षेत्रातील अंतर्गत रस्त्यावरूनच येतील असे दिसते.

करीता एस.टी.महामंडळास सदरील गेटचे बांधकाम करण्यास मनाई करण्यात यावी व एस.टी.महामंडळाच्या बसेस जालना रोडवरील मुख्य रस्त्यावरूनच सिडको बसस्टॅण्डकडे घेण्यात याव्यात. याबाबत प्रशासनामार्फत संबंधीतास पत्र देण्यात यावे.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव व मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती राखी प्रशांत देसरडा.

**अनुमोदक:-**श्री.मनोज बन्सीलाल गांगवे, श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड,

मा.महापौर :विषय मंजुर, प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडकोच्या बसस्टॅण्डच्या कंपाऊंडवॉलला अक्षयदिप प्लाझाच्या पाठीमागे असलेल्या ठिकाणी एस.टी.महामंडळातर्फे बांधण्यात येणाऱ्या दुसऱ्या गेटचे बांधकाम करण्यास मनाई करण्यास मंजुरी देण्यात येते. तसेच एस.टी.महामंडळाच्या बसेस जालना रोडवरील मुख्य रस्त्यावरूनच सिडको बसस्टॅण्डकडे घेण्यात याव्यात याबाबत नियमाप्रमाणे प्रशासनामार्फत एस.टी.महामंडळास पत्र देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४७०:-** (शहर अभियंता)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नाथ सिडस् ते दिशा संस्कृतीकडे जाणारा विकास योजना रस्ता हा अत्यंत खराब झालेला असल्याने व सदर रस्ता या भागातील अनेक नव्याने विकसीत झालेल्या वसाहतींला पैठण रोडला जोडणारा एकमेव रस्ता असल्याने सदर रस्ता विकसीत करण्यासाठी रक्कम रुपये १,७८,८४,५२१/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरचा रस्ता हा अत्यंत वर्दळीचा असून या रस्त्यावर नियमितपणे मोठ्या प्रमाणात रहदारीचा व्याप वाढलेला आहे. त्यामुळे या रस्त्याचे डांबरीकरण करणे अत्यंत आवश्यक आहे.

नाथ सिड्स मागील नाथ सिड्स ते दिशा संस्कृती डी.पी.रस्त्याचे डांबरीकरण करणे बाबतच्या कामाचे रक्कम रुपये १,७८,८४,५२१/- एवढ्या रक्कमेचे अंदाजपत्रक आर्थिक तरतुद उपलब्ध होणेच्या मंजुरीस्तव प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सविनय सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नाथ सिड्स मागील नाथ सिड्स ते दिशा संस्कृती या डी.पी.रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामाचे रक्कम रुपये १,७८,८४,५२१/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४७१:-**

संचालक, महानगरपालिका प्राणी संग्रहालय यांनी प्रस्ताव सादर केला की, सन-२०१६-२०१७ या एका आर्थिक वर्षासाठी महानगरपालिका प्राणी संग्रहालयातील हिंस्त्र प्राण्यांकरीता लागणारे बीफ खरेदीसाठी ई-टेंडरद्वारा निवीदा मागविण्यात आल्या असता, एकूण ४ निविदांची विक्री झाली असून पैकी एका निविदाधारकाने कागदपत्रांची पुर्तता न केल्यामुळे टेक्निकली रिजेक्ट करण्यात आली. उर्वरित तीन निविदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नाव | दर प्रति किलो रुपये |
|---|---|---|
| १ | अब्दुल हमीद हनीफ कुरेशी | रुपये 166.50 |
| २ | अब्दुल अजीम अब्दुल रहीम | रुपये 160.00 |
| ३ | गफुर मियाँ कुरेशी | रुपये 162.00 |

वरील तीन निविदाधारकांपैकी श्री.अब्दुल अजीम अब्दुल रहीम यांचे दर रु. 160.00 प्रति किलो सर्वात कमी आहेत.

प्राणी संग्रहालयात वाघ, पांढरे वाघ, बिबटे, कोल्हे, लांडगे, तरस, मगर व उदबिल्ले असे एकुण 22 मांसाहारी प्राणी असून केंद्रिय प्राणीसंग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या मानकानुसार प्राण्यांकरीता बीफ खाद्य पुरवठ्यासाठी प्राप्त कमी दराने अंदाजे वार्षिक खर्च रु. 57,09,120.00 अपेक्षित आहे.

तुलनात्मक दरानुसार प्राणी संग्रहालयातील मांसाहारी प्राण्यांसाठी बीफ खरेदी करीता श्री.अब्दुल अजीम अब्दुल रहीम यांचे दर रु. 160.00 प्रति किलो सन-2016-17 या कालावधी करीता विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन-२०१६-२०१७ या एका आर्थिक वर्षासाठी महानगरपालिका प्राणी संग्रहालयातील हिंस्त्र प्राण्यांकरीता लागणारे बीफ खरेदीसाठी ई-टेंडरद्वारे मागविण्यात आलेल्या निवीदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर असलेले श्री.अब्दुल अजीम अब्दुल रहीम यांचे रु.160.00 प्रति किलोच्या दरास मंजुरी देण्यात येते तसेच प्राप्त कमी दराने येणाऱ्या अंदाजे वार्षिक खर्च रु.57,09,120.00 च्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४७२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिडको एन-३ येथील साई ट्रान्सपोर्ट ते डॉ.मालानी यांच्या घरापर्यंत छत्रपती कॉलेजकडे जाणाऱ्या रस्त्याला “श्री विजय रामसुरीजी मार्ग” व जालना रोडवरील हॉटेल रामा व हॉटेल अँबेसेडर समोरील हायकोर्टाच्या बाजुने सिडको एन-३ कडे वळणाऱ्या चौकास “संत सेवालाल महाराज चौक” असे नाव देण्यात यावे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती माधुरी मिलींद देशमुख, श्रीमती मनिषा बाळासाहेब मुंढे,श्री.गजानन भानुदास मनगटे

**अनुमोदक:-**श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड, श्री.भगवान (बापु) देविदास घडमोडे.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडको एन-३ येथील साई ट्रान्सपोर्ट ते डॉ.मालानी यांच्या घरापर्यंत छत्रपती कॉलेजकडे जाणाऱ्या रस्त्याला “श्री विजय रामसुरीजी मार्ग” असे नाव देण्यास तसेच जालना रोडवरील हॉटेल रामा व हॉटेल अँबेसेडर समोरील हायकोर्टाच्या बाजुने सिडको एन-३ कडे वळणाऱ्या

चौकास "संत सेवालाल महाराज चौक" असे नाव नियमाप्रमाणे देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४७३:-** **(कार्यकारी अभियंता,जलनि:सारण प्रकल्प)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, केंद्र व राज्य शासन औरंगाबाद महानगरपालिकेच्या सहभागातून UIDSSMT योजने अंतर्गत शहरात भुमिगत गटार योजना राबविण्यात येत असून या योजनेमध्ये शहरामध्ये ४ विविध ठिकाणी एकुण २१६ द.ल.लि.क्षमतेचे सिवेज ट्रिटमेंट प्लॅन्ट बांधण्यात येणार आहेत. त्याशिवाय एकुण २६० कि.मी.लांबीची मुख्य व अंतर्गत जलनि:सारण वाहिनी टाकण्यात येणार आहे. त्यानुसार या योजनेत जलनि:सारण वाहिनी टाकण्याचे व कांचनवाडी,झाल्टा,पडेगाव येथे सिवेज ट्रिटमेंट प्लॅन्ट बांधण्याचे काम प्रगतिपथावर आहे. पुर्वनियोजनानुसार या प्रकल्पाद्वारे पुढील १५ वर्षाचे नियोजन गृहीत धरुन २१६ द.ल.लि.प्रक्रियायुक्त पाणी प्रती दिवस निर्माण होणार आहे. सद्यस्थितीत औरंगाबाद शहराला होणारा पाणी पुरवठा व नैसर्गिक पाण्याचे स्त्रोत विचारात घेता आजमितीस प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर सुमारे १०० द.ल.लि.प्रक्रियायुक्त पाण्याची निर्मिती होणार आहे. निविदा अटी नुसार सदर प्रकल्पाची देखभाल व दुरूस्ती कंत्राटदारास पुढील १० वर्षापर्यंत करावयाची आहे. मात्र सदर प्रकल्प चालविण्यासाठी येणारे विद्युत देयकाचा मासिक खर्च हा महानगरपालिकेस करावा लागणार असून त्यासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च येणार आहे. शिवाय कंत्राटदाराचा १० वर्षाचा देखभाल दुरूस्ती कालावधी संपल्यानंतर या प्लॅन्टचे संचलनाचा खर्च सुध्दा महानगरपालिकेस करावा लागेल.

त्यासाठी भविष्यात लागणाऱ्या खर्चाची तरतुद होण्याच्या दृष्टिने व निर्माण होणारे प्रक्रियायुक्त पाणी विचारात घेता सदर प्रक्रियायुक्त पाणी विक्री करता येणे शक्य आहे. सद्यस्थितीमध्ये औरंगाबाद शहरात DMIC प्रकल्प आकारास येत असून त्यांना तसेच हिमायत बाग परिसरातील फळ संशोधन केंद्रास पाण्याची मोठ्या प्रमाणावर आवश्यकता भासणार आहे. तशी मागणी हिमायत बाग परिसरात फळ संशोधन केंद्राकडून महानगरपालिकेस करण्यात आली असून DMIC प्राधिकरणाने सुध्दा प्राथमिक स्वरुपात प्रक्रियायुक्त पाणी उचलण्यास स्वारस्य दाखविले आहे.

त्यामुळे उक्त बाबी विचारात घेता प्रकल्पाचा खर्च भागविण्यासाठी या निर्माण होणाऱ्या प्रक्रियायुक्त पाण्याची विक्री करणे योग्य ठरते. त्या अनुषंगाने भविष्यात महानगरपालिकेकडे प्रक्रियायुक्त पाण्यासाठी मोठी मागणी येऊ शकते. जे प्रक्रियायुक्त पाणी या प्रकल्पातून तयार होणार आहे. ते जलचरांसाठी, उद्यानासाठी व शेतीसाठी (Non Potable Uses) उपयुक्त ठरणार आहे. त्यासाठी या प्रकल्पाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचेकडून स्वारस्य अभिकर्ता दराचे निविदा अभिलेख (Expression of Interest) नमूना स्वरुपात तयार करून घेण्यात आला आहे. त्यामध्ये गरजेनुसार व ठरणाऱ्या धोरणानुसार आवश्यक फेरबदल करता येऊ शकेल. प्राथमिक अंदाजानुसार प्रक्रियायुक्त पाण्याचा दर हा सुमारे रु.७/- (सात रुपये) प्रती किलोलिटर असा काढण्यात आला असून सदरचा दर पहिल्या ५.०० लक्ष लिटर पाण्यासाठी लागू असेल व त्यापुढे अधिक पाण्यासाठी स्वारस्य अभिकर्त्याकडून निविदा दर भरणा करून घेण्यात येणार आहे यासाठी स्वारस्य देकार मागविण्याचे कार्यालयाचे नियोजन आहे. प्राथमिक अंदाजानुसार प्रक्रियायुक्त पाणी तयार करण्यासाठी ढोबळ मानाने हा सन २०१७-१८ साठी रु.२.९८ प्रती किलो लिटर एवढा खर्च अपेक्षित आहे.

त्यामुळे वर नमुद नुसार सर्व STP प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर निघणाऱ्या पाण्याचे नियोजन केल्यास भविष्यात सिवेज ट्रिटमेंट प्लॅन्ट चालविण्यासाठी येणारा विद्युत देयकांचा व संचलनाचा खर्च काही प्रमाणात भागविणे महानगरपालिकेस शक्य होणार आहे. त्यास्तव प्रक्रियायुक्त पाणी विक्रीसाठी निविदेच्या अटी शर्ती ठरविणे व या कामासाठी निविदा (RFP-Request for proposal) मागविणे व

इतर अनुषंगीक कार्यवाहीचे अधिकार आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रदान करणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, UIDSSMT योजने अंतर्गत औरंगाबाद शहरात राबविण्यात येणाऱ्या भुमिगत गटार योजनेअंतर्गत शहरामध्ये ४ विविध ठिकाणी बांधण्यात येणारे सिवेज ट्रिटमेंट प्लॅन्ट व या शिवाय टाकण्यात येणाऱ्या मुख्य व अंतर्गत जलनि:सारण वाहिनी नुसार या प्रकल्पाद्वारे प्रक्रियायुक्त पाणी निर्माण होणार आहे. भविष्यात लागणाऱ्या खर्चाची तरतुद होण्याच्या दृष्टिने व निर्माण होणारे प्रक्रियायुक्त पाणी विचारात घेता सदर प्रक्रियायुक्त पाणी विक्री करता येणे शक्य आहे. सद्यस्थितीमध्ये औरंगाबाद शहरात DMIC प्रकल्प आकारास येत असून त्यांना तसेच हिमायत बाग परिसरातील फळ संशोधन केंद्रास पाण्याची मोठ्या प्रमाणावर आवश्यकता भासणार आहे. तशी मागणी हिमायत बाग परिसरात फळ संशोधन केंद्राकडून महानगरपालिकेस करण्यात आली असल्याने व DMIC प्राधिकरणाने सुध्दा प्राथमिक स्वरुपात प्रक्रियायुक्त पाणी उचलण्यास स्वारस्य दाखविले असल्याने प्रस्तावात दर्शविलेल्या बाबी विचारात घेता STP प्रकल्पाचा खर्च भागविण्यासाठी या निर्माण होणाऱ्या प्रक्रियायुक्त पाण्याची विक्री करणे योग्य राहील. करीता, प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे सर्व STP प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर निघणाऱ्या पाण्याचे नियोजन केल्यास भविष्यात सिवेज ट्रिटमेंट प्लॅन्ट चालविण्यासाठी येणारा विद्युत देयकांचा व संचलनाचा खर्च काही प्रमाणात भागविणे महानगरपालिकेस शक्य होणार आहे. त्यास्तव प्रक्रियायुक्त पाणी विक्रीसाठी निविदेच्या अटी शर्ती ठरविणे व या कामासाठी निविदा (RFP-Request for proposal) मागविणे व इतर अनुषंगीक कार्यवाहीचे अधिकार आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रदान करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा:-**

श्री.नंदकुमार घोडेले :महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधिकारी प्रतीनियुक्तीवर श्री.चहल मनपात रुजू झाले आहेत. त्यांनी सभागृहाला आपला परिचय करून द्यावा.

(श्री.चहल, उपअभियंता सभागृहास आपला परिचय करून देतात.)

मा.महापौर :श्री.चहल आपण सर्व सदस्यांचे फोन क्रमांक घेऊन त्यांच्याशी संपर्कात राहून काम पहावे.

श्री.नाईकवाडी अब्दुल रहिम :मा.आमदार जलील यांनी ६३ संगणक शाळेला दिलेले आहे, सभागृहाच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात यावे.

श्री.गजानन बारवाल :अनुमोदन देण्यात येते.

मा.महापौर :मा.आमदार श्री.इम्तिहाज जलील यांनी महानगरपालिकेच्या होतकरू विद्यार्थ्यांसाठी शाळेला त्यांच्या निधीमधुन संगणक पुरवठा केलेला आहे त्याबद्दल सभागृहाच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात येते. तसेच इतर स.आमदार साहेब यांना विनंती करून पत्र देऊ की, त्यांनीही मनपाच्या शाळेतील विद्यार्थ्यांना संगणक तसेच संगणकीय शिक्षण देणेविषयी विनंती करण्यात येईल. शहर अभियंता श्री.पानझडे यांचा आज जन्मदिवस आहे त्यांच्या जन्मदिवसाच्या सभागृहाच्या वतीने सुभेच्छा देण्यात येतात.

| | |
|---|---|
| श्री.राजगौरव वानखेडे | :दहावीमध्ये गुणवत्तेमध्ये आलेले महानगरपालिकेचे विद्यार्थीनी हिला ९३.४० टक्के नरवडे शिवाजी कल्याण हिला पडलेले आहे. अंकुश केदारे ९० टक्के , कल्याणी जाधव ८८ टक्के, आधाने, फारूकी परवेज निसार, यांचेही कौतुक सभागृहात होणे आवश्यक आहे. त्यांचे अभिनंदन करण्यात यावे. |
| मा.महापौर | :अभिनंदन व विद्यार्थ्यांच्या सत्कार सभागृहात करण्यात येईल. |
| श्रीमती शेख समिना | :एवरेस्ट विर शेख रफिक यांचे अभिनंदन करण्यात यावे. |
| मा.महापौर | :पुढच्या सभेत अभिनंदन करण्यात येईल. याबाबतचे नियोजन करण्याव येईल. |
| श्रीमती माधुरी देशमुख | :जैन वार्कर्स ग्रुप यानी मोराचे प्राण वाचवले आहे, वर्तमानपत्रातील मोराला वाचविण्यात आल्याची बातमी दाखवतात व ज्या मुलांनी मोराचे प्राण वाचविले त्यांचाही या सभागृहातर्फे अभिनंदन करण्यात यावा. |
| मा.महापौर | :विद्यार्थीनीना प्रोत्साहन देणेसाठी आपण अशा मुलांचा तसेच इतर सर्वांचे सभागृहात सत्कार अभिनंदन करण्यात येईल. |
| श्री.राजु शिंदे | :WC मधूनकिती काम मंजुर आहेत. भूमिगतचे कामे तत्कालिन आयुक्त श्री.केंद्रेकर यांनी पहाणी करून चालु करण्याबाबत निर्देश दिले हेते परंतु आता कामे बंद आहे, बरेच ठिकाणी कामे ही अर्धवट आहेत. माझ्या वार्डातील एक गल्लीत ड्रेनेज लाईन फुटल्यामुळे अनेक दिवसांपासून उघडयावर वाहत आहे. गल्लीतील नागरीक आजारी पडत आहे, जे काम चालु आहे ते पुर्ण करण्यात यावे, तसेच इतर ठिकाणची शार्टनोटीस काढावे व कामे तात्काळ सुरू करण्यात यावे. ड्रेनेज व पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन एकाच ठिकाणी असल्यामुळे घाण/दुषित पाणी येत आहे. तरी तुटलेली पाण्याची लाईन जोडण्यात यावी. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :भुमिगत गटार योजनेतुन खामनदीतून मोठी लाईन टाकण्यात आली आहे. टाकण्यात आलेली मोठी लाईन चालु करण्यात यावी. |
| श्रीमती शोभा वळसे | :वार्ड क्रमांक २९ येथे जुनी ड्रेनेज लाईन आहे, पिण्याच्या पाण्यामध्ये ते मिक्स होत आहे, आजुबाजूला दुर्गंधी पसरत आहे. |
| श्रीमती मनिषा मुंडे | :माझ्या वार्डात ड्रेनेज मिश्रीत पाणी येत आहे. अनेक दिवसांपासून हा विषय प्रशासनासमोर मांडत आहे. परंतु दुर्लक्ष करण्यात येत आहे. |
| श्री.गोकुलसिंग मलके | :नारेगांव भागात चार ते पाच गल्ल्यांमध्ये पाणी येत नाही. |
| मा.महापौर | :सदरील प्रश्न प्रत्येक वार्डातील आहे, प्रत्येक सदस्यांचा हा प्रश्न आहे, समांतर लिकेजेस् काढण्यात येत नाही. |
| श्री.गजानन बारवाल | :केसरसिंगपुरा येथील पाण्याचा प्रश्न आहे लिकेजेस् बाबत वारंवार पाठपूरावा करण्यात येतो परंतु लिकेजेस् काढण्यात येत नाही. |
| श्री.नंदकुमार घोडेले | :water utility company चे office १५ दिवसांपासून बंद आहे. त्यांनी बंद केले की आपण बंद केले? कुठलेच दुरूस्तीचे कामे होत नाही. हे का होत नाही, याचा खुलासा करण्यात यावा. |

| | |
|---|---|
| श्री.खान जहांगीर मुलानी | :कंपनीचे पेमेंट केले नाही तर दुरूस्तीचे कामे थांबवु शकता का? खुलासा करण्यात यावा. |
| श्री.नंदकुमार घोडेले | :शहर अभियंता यांनी खुलासा करावा. कंपनीच्या सिस्टीममध्ये काय सुधारणा करणार याबाबत प्रशासनाने खुलासा करावा. |
| श्रीमती शेख समिना | :सर्वसाधारण सभेमध्ये निर्णय घेण्याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने सांगीतलेले आहे. सदरील सभा केव्हा आयोजित करण्यात येणार आहे? |
| मा.महापौर | :खुलासा करण्यात यावा. |
| शहर अभियंता | :कंपनीने कामे बंद केलेले आहे, दुरूस्तीचे, वॉलचे, जोडणीचे कामे बंद केलेले आहे. कंपनीचे व्हेन्डरचे पेमेंट नसल्यामुळे बंद केलेले आहे आज त्यांचे पेमेंट करण्यात येणार आहे. स.सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर तात्काळ कारवाई करण्यात येणार आहे. |
| श्री.राजु शिंदे | :अचानक असे काय झाले की, समांतरने काम बंद केले? याचा खुलासा करण्यात यावा. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :समांतरने आत्ता कुठे पाईप आणुन कामे सुरू केली होती परंतु तेही बंद केली जो पर्यंत याबाबत मा.सर्वसाधारण सभ्‍चा निर्णय होत नाही तो पर्यंत कामे करण्यात येणार नाही. प्रशासनाने याबाबतीत काय निर्णय घ्यायचा तो घ्यावा म्हणजे नागरीकांना तसे अवगत करण्यात येईल. |
| मा.आयुक्त | :Utility चे payment आज करणार आहोत. काम सुरू करण्याबाबत सांगण्यात येणार आहे. दुरूस्तीचे कामे करण्याची कंपनीची जबाबदारी आहे. लवकरच प्रशासनाची भुमिका मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवणार आहोत. Utility वेठीस धरत आहेत. मुलभूत सुविधेपासून वंचित ठेवता येत नाही. भुमिगत गटार योजनेबाबत DPR प्रमाणे आपण काम करणार आहोत. अंतर्गत कामे महानगरपालिकेच्या फंड मधुन करण्यात येईल. अमृत योजनेत ५० टक्के फंड मिळाला आहे. सातारा देवळाईचा मोठा विषय आहे, कृपया त्याला मान्यता दिल्यास ५० कोटी मनपा व ५० कोटी शासन असे एकुण १०० कोटीचे काम आपणास करावयास मिळणार आहे. |
| श्रीमती ज्योजी जयेश अभंग | :महानगरपालिकेचे सफाई कर्मचारी ज्या ठिकाणी राहतात त्या ठिकाणी कुठलिच सफाई होत नाही, पाणी नाही, परंतु ४ महिन्यापासून मी पाण्याबाबत बोलत आहे. |
| श्रीमती संगिता वाघुले | :मिसरवाडी पाण्यावाचून वंचित का ठेवण्यात येत आहे? |
| मा.महापौर | :नवीन वस्तीमध्ये सुविधा देण्यासाठी थोडा वेळ द्यावा लागतो. |
| श्री.रामेश्वर भादवे | :मोतीकारंजा औषधी भवन येथील भुमिगत गटार योजनेचे काम अर्धवट अवस्थेत सोडलेले आहे खुलासा करण्यात यावा. |
| कार्यकारी अभियंता | :प्रत्यक्ष पहाणी करून माहिती देण्यात येईल काही प्रमाणात अतिक्रमणाचा विषय आहे. |
| मा.आयुक्त | :याबाबत एक संयुक्तीक बैठक घेवुन या सर्व बाबींचा आढावा घेणार आहोत. |

(काही ऐकू येत नाही सभागृहात वेळ दु.१.१५) श्री.मेघावाले हे महापौर म्हणुन स्थानापन्न होतात.

वेळ दु.१.१५. मा.आयुक्त ही सभागृह सोडून जातात.

| | |
|---|---|
| मा.महापौर | :आयुक्तांच्या जागी श्री.पानझडे यांनी बसावे. |

(आयुक्तांच्या जागी  श्री.पानझडे बसतात.)

| | |
|---|---|
| कार्यकारी अभियंता | : (काही ऐकू येत नाही) माहिती घेऊन आपणास माहिती देण्यात येईल. |
| मा.महापौर | :एका एका स.सदस्यांनी बोलावे. |
| श्री.नाईकवाडी अब्दुल रहिम | :औषधी भवनाला पाच दिवसांची नोटीस देण्यात आली आहे. खुलासा व्हावा. |
| मा.महापौर | :संबंधीत अधिकारी यांनी खुलासा करावा. |
| कार्यकारी अभियंता | :मोती कारंजा येथील दर्ग्याच्या जागेचा वाद आहे त्यामुळे काम थांबलेले आहे. याबाबत पडताळणी करून कार्यवाही करण्यात येईल. |
| मालमत्ता अधिकारी | :औषधी भवन बाबत मालमत्ता विभागामार्फत कराराचा भंग केला असल्याने इमारत खाली करून देण्यासंदर्भात सात दिवसांची नोटीस देण्यात आली होती. संबंधीत प्रकरणी मा.न्यायालयात दोन तारखा झालेल्या आहेत २२ व २४ तारीख देण्यात आलेली आहे. |
| श्री.विकास एडके | :युआयडी अंतर्गत काही भिंती तोडण्यात येतात. |
| कार्यकारी अभियंता | :पाहणी करण्यात येईल, युआयडी अंतर्गत तुटली असेल तर बनवुन देण्यात येईल. |
| श्रीमती सुमित्रा हाळनोर | :दशमेशनगर नाल्यावरील अतिक्रमण अजुनपर्यंत काढण्यात आले नाही. |
| कार्यकारी अभियंता | :याबाबत कार्यवाही करण्यात येईल. |

याच बरोबर राष्ट्रगीताने सभा संपन्न झाल्याचे मा.महापौरांनी घोषित केले.

नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद